**प्रेस नोट** ता. ११/०७/२०१९

## दुचाकी वाहन चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास गुन्हे शाखा युनिट २ कडुन जेरबंद १४ दुचाकी वाहने हस्तगत

पुणे शहरात होणाऱ्या वाहनचोरीच्या गुन्हयांना प्रतिबंध व्हावा याकरीता अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री शिरीष सरदेशपांडे, सहा पोलीस आयुक्त, गुन्हे १ श्री समीर शेख यांनी वाहनचोरी होणारे ठिकाणी भेट देवून सदर भागात कोणत्यावेळी कोणत्या दिवशी वाहनचोरी होत आहे याबाबत दाखल गुन्हयांचा आढावा घेवून हॉट स्पॉटवर सापळे रचून वाहनचोरी करणारे रेकॉर्ड वरील गुन्हेगार चेक करुन वाहनचोरीच्या गुन्हयांना प्रतिबंध करावा असे आदेश दिल्याने गुन्हे शाखा, युनिट २ चे पोलीस निरीक्षक श्री गजानन पवार यांनी त्यांचे युनिट चे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे दोन पथक तयार करुन एक पथक भारती विदयापीठ, सहकारनगर, दुसरे पथक बंडगार्डन, लष्कर भागात वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्याकरीता नेमण्यात आले होते.

युनिट २ चे पोलीस निरीक्षक श्री गजानन पवार यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, जुना रेकॉर्डवरील वाहनचोर संतोष शिवराम घारे, वय ३३, रा. मु.पो. ओझर्डे, ता. मावळ, जि. पुणे हा साधूवासवाणी चौकातील पेट्रोलपंपा समोर थांबलेला असून त्याचेकडे एक मोटारसायकल आहे अशी बातमी मिळाल्याने त्यांनी त्यांचे युनिट कडील अधिकारी व कर्मचारी यांना तात्काळ सदर ठिकाणी जावून ताब्यात घेणेबाबत आदेश दिल्याने सदर स्टाफ वरील ठिकाणी जावून संतोष शिवराम घारे यास ताब्यात घेवून त्यांचेकडे असणाऱ्या मोटारसायकलचे कागदपत्रे बाबत चौकशी केली असता तो उडवा उडवीची उत्तरे देत असल्याने त्याने त्यांचेताब्यातील गाडी कोठूनतरी चोरुन आणली असल्याची खात्री झाल्याने सदरची गाडी मूळ मालकाचे तपासकामी पंचनाम्याने जप्त करुन ताब्यात घेवून सदर इसमास सीआरपीसी ४१ (१)(ड) प्रमाणे अटक करण्यात आली. त्याचे ताब्यातील गाडीचे नंबरवरुन माहिती काढली असता सदर मोटारसायकल बाबत बंडगार्डन पोलीस स्टेशन गुरनं. २७०/२०१९, भादवि क. ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे निदर्शनास आले. त्यास दाखल गुन्हयात अटक करुन तपास केला असता त्याने पुणे शहरात शिवाजीनगर, लष्कर, बंडगार्डन, चतु:श्रृंगी, बिबवेवाडी तसेच इंदापूर या पोलीस स्टेशनच्या हद्दीत वाहनचोरी केल्याचे तपासात सांगून चोरीच्या एकुण कि.रु. ३,३०,०००/- च्या बजाज कंपनीच्या पल्सर, डिस्कवर, विंड व हिरो कंपनीच्या स्प्लेंडर, शाईन, ॲक्टीवा, डिलक्स, ड्रिम युगा अशा एकूण १४ गाडया हस्तगत करण्यात आलेल्या असून यांचे मालकांचा शोध घेवून दाखल गुन्हयांची माहिती घेतली असता हडपसर, शिवाजीनगर, बंडगार्डन, बिबवेवाडी, चतु:श्रृंगी, लष्कर, कोंढवा, इंदापूर या पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल असून उर्वरीत दुचाकी वाहनांची माहिती प्राप्त करण्याचे काम चालू आहे.

सदर आरोपी नामे संतोष शिवराम घारे, वय ३३, रा. मु.पो. ओझर्डे, ता. मावळ, जि. पुणे यांचेंवर २००३ साली वाहनचोरीचे ६ गुन्हे तसेच २०१७ साली गुन्हे शाखा, युनिट २ ने पकडून त्याचेकडून ४० वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आणले होते. तो दि. १०/०५/२०१९ रोजी जामीनावर सुटलेला आहे. आरोपी संतोष घारे हा बिल्डींग बांधकामामध्ये सेट्रींगचे काम करुन उदरनिर्वाह करतो व पैशाची गरज लागल्यास बनावट चावीच्या आधारे दुचाकी वाहनाची चोरी करुन त्याचे गावातील

Pune Police

ओळखीच्या लोकांना माझी पत्नी किंवा मुलगी आजारी असून पैशाची गरज आहे असे कारण सांगून ५००० ते १०००० रुपये पर्यंत वाहनाची विक्री करुन कागदपत्रे नंतर देतो असे सांगत होता.

अशा प्रकारे दुचाकी चोरी करणारा सराईत गुन्हेगार नामे संतोष शिवराम घारे, वय ३३, रा. मु.पो. ओझर्डे, ता. मावळ, जि. पुणे यास युनिट २ चे पथकाने अटक करुन त्याचे कडून एकूण ३,३०,०००/- रु किमतीची १४ वाहने हस्तगत करुन त्यापैकी ०९ गुन्हे उघडकीस आणण्यात यश आलेले असून सदर आरोपीची दि. १४/०७/२०१९ पावेतो पोलीस कस्टडी रिमांड असून आणखीन वाहने प्राप्त होवून गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदरची कामगिरी अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री शिरीष सरदेशपांडे, सहा पोलीस आयुक्त, गुन्हे १, श्री समीर शेख यांचे मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक गजानन पवार, सपोनि जयवंत जाधव, पोउनि नितीन शिंदे, पोलीस कर्मचारी संजय दळवी, यशवंत आंब्रे, अनिल ऊसुलकर, शेखर कोळी, दिनेश गडांकुश, अस्लमखान पठाण, विनायक जाधव, किशोर वग्गु, अतुल गायकवाड, विशाल भिलारे, उत्तम तारु, चेतन गोरे, यशवंत खंदारे, मोहसिन शेख, चंद्रकांत महाजन, अजित फरांदे, कदिर शेख, स्वप्निल कांबळे, विवेक जाधव, मितेश चोरमोले, गोपाळ मदने यांनी केलेली आहे.

(गजानन पवार)
पोलीस निरीक्षक
युनिट २, गुन्हे शाखा, पुणे शहर

